# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.
# दिनांक-03.06.2026

---

**<u>आग</u>**

राजधानी दिल्लीतील मालवीय नगर इथल्या एका हॉटेलमध्ये आज सकाळी आग लागल्यामुळं 21 जणांचा मृत्यू झाला, तर 40 जणांना सुखरूप वाचवण्यात आलं. दक्षिण दिल्लीचे पोलीस उपायुक्त अनंत मित्तल यांनी सांगितलं की, अग्निशमन दलाच्या आठ गाड्यांच्या मदतीनं ही आग यशस्वीरित्या शमवण्यात आली आहे. पोलीस, अग्निशमन दल आणि इतर आपत्कालीन प्रतिसाद पथकांच्या समन्वित प्रयत्नांतून 40 हून अधिक व्यक्तींना वाचवण्यात आले असून, त्यांना वैद्यकीय उपचारांसाठी जवळच्या रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आलं आहे. आगीचं कारण समजू शकलेलं नाही.

**<u>विधान परिषद निवडणुक</u>**

विधान परिषदेच्या निवडणुकीत महायुतीचे सर्व 17 अधिकृत उमेदवार विजयी होतील, असा ठाम विश्वास भाजपा प्रदेश अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी आज मुंबईत व्यक्त केला. महायुतीच्या संयुक्त पत्रकार परिषदेत चव्हाण बोलत होते. यावेळी चव्हाण यांनी महायुतीच्या अधिकृत उमेदवारांची यादी जाहीर केली. भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी या महायुतीच्या घटक पक्षांतर्फे घेण्यात आलेल्या या संयुक्त पत्रकार परिषदेला राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, शिवसेना नेते राहुल शेवाळे, भाजपा प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन उपस्थित होते.

**<u>कांदा-बियाणे</u>**

महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉक्टर विलास खर्चे आणि संशोधन संचालक डॉक्टर प्रशांत बोडके यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रमुख बियाणे शास्त्रज्ञ डॉक्टर नरेंद्र काशीद यांच्या देखरेखीखाली कृषि विद्यापीठाच्या बियाणे विक्री केंद्रात फुले समर्थ या वाणाच्या कांदा बियाण्याची विक्री आज सुरू करण्यात आली. विद्यापीठाच्या फुले समर्थ वाणाला त्याच्या आकर्षक लाल रंगामुळे बाजारामध्ये इतर कांदा वाणापेक्षा जास्त बाजारभाव मिळत असल्याचं कुलगुरु डॉक्टर खर्चे यांनी सांगितलं. बियाणे विक्रीच्या पहिल्याच दिवशी बियाण्यास शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिसून आला. डॉक्टर नरेंद्र काशिद यांनी या वर्षीची बियाणे विक्री प्रक्रिया सुलभ होण्यासाठी ऑनलाईन आणि ऑफलाइन पध्दतीचा वापर केला असून महिलांसाठी स्वतंत्र विक्री व्यवस्था निर्माण केली आहे. कांदा बियाण्याची विक्री व्यवस्था ही कांदा बियाणे शिल्लक असेपर्यंत चालू राहणार आहे.

**<u>पर्यटन</u>**

अमृत म्हणजे महाराष्ट्र संशोधन, उन्नती आणि प्रशिक्षण प्रबोधिनीमार्फत राबविण्यात येत असलेल्या 'अमृत पर्यटन' उपक्रमांतर्गत पर्यटन क्षेत्राशी संबंधित उद्योजक, व्यावसायिक आणि नवउद्योजकांसाठी उद्योजकता कौशल्य विकास कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. पर्यटन क्षेत्राशी संबंधित सर्व उद्योजक, व्यवसायिक तसंच इच्छुक युवक-युवतींनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असं आवाहन आयोजकांनी केलं आहे. महाराष्ट्रातील पर्यटन क्षेत्राला चालना देण्यासाठी, स्थानिक रोजगार निर्मिती वाढविण्यासाठी तसंच पर्यटनाशी संबंधित उद्योजकांना सक्षम करण्याच्या उद्देशाने

'अमृत पर्यटन' हा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून राज्यातील पर्यटन स्थळं, पर्यटन सेवा, स्थानिक उत्पादनं आणि पर्यटन व्यवसायांना नव्या संधी उपलब्ध करून देण्याचं उद्दिष्ट ठेवण्यात आलं आहे.

**<u>मदत</u>**

पुणे महानगरपालिकेतील दहा हजारांहून अधिक कंत्राटी कामगारांना महापालिकेच्या अंशदायी साहाय्य योजनेचं सभासदत्व विनाशर्त मिळावे, अशी मागणी करणारा प्रस्ताव काँग्रेस पक्षाच्या वतीनं स्थायी समितीसमोर सादर करण्यात आला आहे. सध्याच्या नियमांनुसार, ESIC योजनेची वेतन मर्यादा 21 हजार रुपये आहे. त्यामुळे 21 हजारांपेक्षा जास्त वेतन असलेले कुशल आणि अर्धकुशल कंत्राटी कामगार या वैद्यकीय सुविधेपासून वंचित राहत आहेत. तसंच, येत्या काही महिन्यांत महागाई भत्ता वाढल्यानं अकुशल कामगारांचे वेतनही वाढणार असून, ते देखील या योजनेतून वंचित राहण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर, काँग्रेसचे महापालिकेतील गटनेते चंदू कदम आणि नगरसेवक सुनील शिंदे यांनी हा प्रस्ताव दिला आहे.

**<u>मदत</u>**

बुलढाणा जिल्ह्यातील केळवद इथले फुलेप्रेमी कवी मनोहर पवार यांच्या अकाली निधनानंतर, त्यांच्या कुटुंबाला कवी-कवयित्रींच्या वतीनं तीन लाख रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली आहे. शेतातील आंब्याच्या झाडावरून पडून पवार यांचं निधन झालं होतं.

**<u>विश्वबंधुता</u>**

विश्वबंधुता साहित्य परिषद, विश्वबंधुता मूल्यसंवर्धन समिती आणि काषाय प्रकाशन यांच्या वतीनं विश्वबंधुता दिन, 'विश्वधर्म बंधुता' ग्रंथाचं प्रकाशन, काव्य संमेलन आणि पुरस्कार वितरण अशा कार्यक्रमाचं आयोजन पुण्यात करण्यात आलं होतं. काव्यसंमेलनामध्ये महाराष्ट्रातील 25 नामवंत कवी सहभागी झाले होते. यावेळी बारा साहित्यिकांना 'विश्वबंधुता प्रकाशदूत' पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरांत उद्या दुपारनंतर हलक्या पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**